# 'मेट्रो ३'वरील बॅरिकेड्स ऑक्टोबरपासून हटवणार

मुंबई, ता. २० : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गाच्या कामासाठी शहर आणि उपनगरात विविध ठिकाणी उभारण्यात आलेले बॅरिकेड्स ऑक्टोबरपासून हटवण्यास सुरुवात होणार आहे. भूमिगत मेट्रोसाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) विविध ठिकाणी बॅरिकेड्स लावल्याने गेल्या सहा वर्षांपासून मुंबईकरांना त्रासाला सामोरे जावे लागत होते; मात्र त्यातून लवकरच सुटका होणार आहे.

राज्य सरकारने मेट्रो ३ च्या आराखड्याला २०११ मध्ये मंजुरी दिली. आवश्यक परवानग्या मिळाल्यानंतर २०१६ मध्ये प्रत्यक्षात प्रकल्पाचे काम सुरू झाले.

सध्या मेट्रो मार्गावरील बोगद्यांचे ९८.६ टक्के काम पूर्ण झाले असून भूमिगत स्थानकांचे सुमारे ८२.६ टक्के काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे शहर आणि उपनगरात ठिकठिकाणी लावलेले बॅरिकेड्स हटवण्याचे काम फेब्रुवारीपर्यंत पूर्ण होईल, अशी माहिती एमएमआरसीच्या वतीने देण्यात आली.